(SJIF) Impact Factor-7.675 ISSN-2278-9308

# B.Aadhar


Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

September-2021

ISSUE No- (CCCXVIII) 318 (A)

## Thoughts and Works of Dr. Babasaheb Ambedkar




Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor
Dr. Pramod S. Meshram
I/c Principal,
Shri M. H. K. College of
Arts & Comm. Pachal

The Journal is indexed in:
Scientific Journal Impact Factor (SJIF)
Cosmos Impact Factor (CIF)
International Impact Factor Services (IIFS)

Aadhar International Publication Amaravati
Website - www.aadharsocial.com - Email - aadharsocial@gmail.com

Govt. College of Arts & Science Aurangabad

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675, Issue NO, 318 (CCCXVIII ) A
ISSN : 2278-9308
September, 2021


| | | |
|---|---|---|
| 41 | उदारवादी प्रजातंत्र के संदर्भ में बाबासाहाब डॉ. अम्बेडकर के विचार<br>डॉ. किशोर बी. वासनिक | 197 |
| 42 | डॉ. आंबेडकरजी के महिला विषयक विचार<br>श्रीमती. डॉ. करूणा दत्तात्रय अहिरे | 201 |
| 43 | हिंदी उपन्यास-साहित्य में प्रतिबिंबित डॉ. आंबेडकरजी की विचारधारा<br>प्रा. डॉ. अशोक आनंदराव साळुंखे | 204 |
| 44 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर का नारीसंबंधी दृष्टीकोन और कार्य<br>प्रा. अशोक गोविंदराव उघडे | 209 |
| 45 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची विद्रोही पत्रकारिता<br>डॉ. संभाजी पाटील /प्रा. बापूसाहेब जवळेकर | 212 |
| 46 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता रोहिणी साळुंखे-चव्हाण | 221 |
| 47 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणिबौध्द धर्म डॉ. रोहिणी रामचंद्र हाके | 225 |
| 48 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची समाजरचनेची सैध्दांन्तिक मांडणी<br>डॉ. रेखा कचरूजी मेश्राम | 228 |
| 49 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची महिला विषय भूमिका व कार्य : एक चिकित्सा<br>डॉ. रेखा मनोहर बडोदेकर | 233 |
| 50 | अस्पृश्यतामुक्ती चळवळ आणि आंबेडकरी चळवळ<br>प्रा.रमेश शंकर माने | 237 |
| 51 | आंबेडकरवादी कविता डॉ. राखी मंगेश जाधव | 245 |
| 52 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता आणि सद्य:स्थिती<br>प्रा.प्रदीप सहदेव चोपडे | 249 |
| 53 | डॉ बाबासाहेब आंबेडकरांची अग्रलेखाची भाषाशैली डॉ पांडुरंग गावडे | 253 |
| 54 | डॉ. आंबेडकर: व्यक्तित्व आणि कार्य प्रा. मुरलीधर बापूराव गवळी | 256 |
| 55 | भारतीय महिलांचे उद्धारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रा.मिलिंद व्यंकटी घाडगे | 260 |
| 56 | ग्रंथकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रीमती मंजुषा कमलाकर स्वामी | 263 |
| 57 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार<br>डॉ. गुरूनाथ इश्राम सामंत /डॉ. जयंत शिवाजी कार्तिक | 266 |
| 58 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे साहित्यविषयक विचार आणि कार्य<br>डॉ. एकनाथ श्रीपती फुटाणे | 273 |


Govt. College of Arts & Science Aurangabad

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे साहित्यविषयक विचार आणि कार्य

डॉ. एकनाथ श्रीपती फुटाणे
मराठी विभाग प्रमुख, मशिसे गट–अ, शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय,
औरंगाबाद. मो.नं. ७७९८१७७४७३.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विचारवंत, परमप्रज्ञावंत तत्वज्ञानी, क्रांतिकारक, समाजसुधारक, संशोधक साहित्याचे अभ्यासक तर होतेच यांपेक्षाही त्यांचे व्यक्तिमत्व हे निसंदेह बहुआयामी होते. समता, बंधुता आणि भगिनीता ही मूल्ये त्यांनी भारतात तर रुजविलीच त्याचबरोबर त्यांना एक वैश्विकता प्राप्त करुन दिली. त्यांच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक आणि साहित्यविषयक विचारांना देशात दीपस्तंभाप्रमाणे अढळ स्थान प्राप्त झाले आहे. त्यांची ग्रंथसंपदा जगन्मान्य झाली आहे. 'हु वेअर दि शुद्राज?' ॲनिहिलेशन 'ऑफ कास्ट' आणि 'दि अनटचेबलस' या ग्रंथामुळे त्यांची समाजशास्त्रज्ञ म्हणून जगाला ओळख झाली.'पार्टिशन ऑफ इंडिया', 'रानडे, गांधी ॲण्ड जिना' आणि 'व्हॉट कॉंग्रेस ॲण्ड गांधी हॅव डन फॉर अनटचेबलस्', हे ग्रंथ ते राज्यशास्त्राचे गाढे अभ्यासक होते याची साक्ष देतात. 'प्रॉब्लेम ऑफ रुपीज' हा ग्रंथ त्यांचा अर्थशास्त्रावरील ग्रंथ आहे. उपरोक्त ग्रंथ हे त्यांचे मूळ इंग्रजी भाषेत आहेत. प्रस्तुत ग्रंथाचे अनेक भारतीय आणि परकीय भाषांमध्ये अनुवाद झालेले आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे उपरोक्त ग्रंथ लिहिले ते समाजाशी अतूट संबध प्रस्थापित करणारे होत. त्यांनी जे मराठी लेखन केले; ते 'मुकनायक', समता, बहिष्कृत भारत आदि नियतकालिक – साप्ताहिकांतून केले. त्यांनी स्वत:विषयी फार लेखन केलेले नसले तरी त्यांचे विचार विविध प्रासंगिक भाषणांतून, लेखनांतून, किंबहूना पत्रकारितांमधून वेळोवेळी व्यक्त झालेले आहेत. याशिवाय त्यांनी 'आत्मकथा' लिहिली आहे. प्रस्तुत लेखात आपण डॉ. बावासाहेव आंबेडकरांची साहित्यिक भूमिका समजून घेणार आहोत. खरे तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची एकूणच जनसामान्य लोकांमधील प्रतिमा समाजसुधारक घटनेचे शिल्पकार किंबहूना घटनातज्ञ, क्रांतिकारी क्रियाशील विचारवंत, तत्वज्ञ, विविध विषयांवर लेखन संशोधन करणारे गाढे अभ्यासक अशी आहे. मात्र 'दलितोध्दारक' ही उपाधी त्यांच्या कार्याला स्मित करणारी आहे

कोणताही क्रांतिकारी विचारवंत हा संस्कृती.–कला या परिघापासून दूर राहू शकत नाही. ते डॉ. आंवेडकरांच्या बावतीतही तंतोतंत लागू पडते. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य आणि कलांचा आस्थेने विचार करीत; त्यांविषयी आपली ठाम भूमिका मांडत असत. त्यांच्या भूमिकेत विचारातच पुढे अनेक साहित्यिकांच्या भूमिकांची विचारांची 'बीजे' रोवली गेली; हे अगदी निर्विवाद सत्य आहे. 'साहित्याने जीवनाचा सर्वांगीण विचार करावा हा विचार मराठी साहित्यात उत्तरोत्तर रुजत गेला. वास्तविक पाहता डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वत: ललितलेखक नव्हते; पण ललित साहित्याबद्दलचा त्यांचा विशिष्ट दृष्टिकोन होता, त्यांची एक स्वतंत्र विचारसरणी होती. एवढच नाहीतर ललित वाङ्.मयाबद्दल त्यांच्या मनात आस्था होती. त्या संदर्भाने अनेक उदाहरणे देता येतील. मराठीतील प्रसिध्द नाटककार राम गणेश गडकरी यांचे नव्याने प्रसिध्द झालेले नाटक मला पाठवून दयावे; असे ते आपल्या मित्राला पत्रात लिहितात. अशा अनेक घटना त्यांच्या जीवनातील सांगता येतील. ज्ञानाचे संवर्धन व सरंक्षण करण्यामागे अस्पृश्य समाजांनी कशी महत्वाची कामगिरी केली आहे. त्यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर उदाहरण देतात. ''अस्पृश्यांनी जो ग्रंथसंग्रह केला तो अफाट होता. असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. श्रीधर स्वामीच्या ग्रंथाच्या हस्तलिखित प्रती तर गाडयाने सापडतील. परंतु मुकुंदराज, ज्ञानेश्वर व मुक्तेश्वर इत्यादी जुनाट व महान कवींच्या ग्रंथाच्या हस्तलिखित प्रती मी अनेक अस्पृश्यांच्या संग्रही पाहिल्या आहेत. इतकेच नव्हे तर, अस्पृश्यांच्या घरी काही निवडक अशा ग्रंथाच्या प्रती सापडतील, अशी माझी खात्री आहे''[१] उपरोक्त परिच्छेदातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्राचीन मराठी वाङ्.मया विषयी असलेली आस्था तर अभिव्यक्त होतेच त्याचबरोबर त्यांची संशोधक दृष्टी किती व्यापक होती याचा प्रत्यय येतो.


Govt. College of Arts & Science
Aurangabad

संत ज्ञानेश्वरांचे ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेवपासष्टी, हरिपाठ हे ग्रंथ तर सर्व जिज्ञासू वाचक अभ्यासकांना प्राप्त झाले; योगवासिष्ठ बद्दलही वादविवाद आहेत. परंतु त्याहीपेक्षा डॉ. बाबासाहेब आंबेडकर दुस—या एका ग्रंथाबद्दल आपली भूमिका मांडताना दिसतात ''ज्ञानेश्वर महाराजांनी 'पंचीकरण' नावाचा एक ग्रंथ लिहिला होता, ही गोष्ट फारसी ऐकिवात नाही. पण हा ग्रंथ मी माझ्या आता दिवंगत झालेल्या मित्राच्या घरी पाहिलेला आहे. काही वर्षांपूर्वी श्री. पांगारकर यांनी राघव चिंतन या कवीने लिहिलेला 'ज्ञानसुधा' नावाचा ग्रंथ कोणाजवळ असल्यास कळवावे, अशी केसरीत जाहिरात दिली होती. ग्रंथाची हस्तलिखित प्रत त्यांना सांपडली नसल्यास त्यांना तो माझ्या अस्पृश्य मित्राच्या संग्रही पाहवयास सापडेल'' यातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अस्पृश्य समाजाने देखील ग्रंथसंग्रह साठवून त्याची जोपासना, संवर्धन केले हे त्यांना सांगायचे आहे. तसेच त्यांची साहित्याविषयीची संवेदनशीलता, जाणीव, त्याचबरोबर सहकार्याची प्रांजळ भावना, हया बाबी लक्षात येतात. त्यांनी प्राचीन संस्कृत—मराठी साहित्याचा अभ्यास केला होता म्हणून त्यांच्या भाषणांमधून मधून—मधून रामायण महाभारतातील उदाहरणे, मराठी, हिंदी संताची वचने, म्हणी यांची पेरणी मुद्दे पटवून देण्यासाठी अगदी चपखलपणे केलेली असे. तुम्हांला ज्या संधी प्राप्त होत आहेत त्याबद्दल ते म्हणतात,

'हिरा पडा हे वाट मे। कोई अंधा निकल जाय'

आंधळयाला हि—याची जाणीव नसते ही आलेली संधी फुकट घालवू नका. जागे व्हा, ज्ञान संपादन करा, शिका संघटित व्हा, संघर्ष करा असा संदेश ते देतात. तुमची परिस्थिती 'अर्थस्य पुरुषो दास' अशी होऊ देऊ नका.[३] त्यासाठी ते महाभारतातील उदाहरण देतात. पुणे करार झाला तो हिंदूना मनापासून नापसंत आहे. खरे पाहिले तर, हिंदू धर्माचे आपण रक्षण करु शकु; पण हिंदू लोक असे आहेत की, पुणे कराराचा फायदा आपल्या पदरी पडू न देता हिंदू व मुसलमान कौन्सिलमध्ये एकत्र होतील आणि सत्तेच्या भांडणात आपल्याला जो हिस्सा मिळायचा तो मिळणार नाही. ते म्हणतात ''महाभारतात कौरव पांडव युध्द झाले, पण त्यात भीष्माचार्याला पांडवाची खरी बाजू माहित असूनही, तो कौरवाचे अन्न खात असल्यामुळे त्यांच्याच बाजूला राहणे त्याला भाग पडले. अर्थात 'अर्थस्य पुरुषो दास' अशी स्थिती तुमची होऊ देऊ नका'' मे १९२४ मध्ये बार्शी (जि. सोलापूर) येथे 'मुंबई प्रांतिक बहिष्कृत परिषद' भरली. त्यांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे भाषण केले ते 'ज्ञानप्रकाश' मध्ये १४ मे व ७ जून १९२४ च्या अंकात छापून आले. त्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांनी 'काय करु नये' यांविषयी सविस्तर विचार मांडले होते. अनेक प्रश्न उपस्थित केले. त्यामध्ये म्हणतात हिंदू धर्मात महान तत्वे आहेत पण समाजात प्रत्यक्षात आंमलात आली आहेत का? आणि तसे जर झाले तर तो सुदिन असेल. हया तत्वांची उदाहरणे देण्यासाठी ज्ञानेश्वरीच्या बाराव्या अध्यायातील जशास तसा भावार्थ प्रतिपादन केला आहे. ''तात्विकदृष्टया हिंदू धर्म कोणत्याही धर्मास हार जाणार नाही. असे माझे मत आहे, नव्हे तो कोणत्याही धर्माहून तो श्रेष्ठच गणला जाईल. या हिंदू धर्मात सर्वभूती एक आत्मा'' असे मूलभूत तत्व आहे. या उदात्त तत्वाप्रमाणे समाज — घटना झाली असती तर — ज्याप्रमाणे दिवा घरच्यांवर तेव्हा उजेड करावा व परक्यांवर अंधार पाडावा, असे करत नाही किंवा ज्याप्रमाणे वृक्ष जो त्याचा उच्छेद करतो अथवा जो त्यास पाणी घालतो, या उभयतांस सारखीच सावली देतो, किंवा पाणी ज्याप्रमाणे गाईची तृष्णा हरुन, वाघाला विष होऊन मारुन टाकत नाही''[४] अशी जर हिंदूची समबुध्दी असती तर ? पण असे होताना दिसत नाही.

प्रस्तुत दृष्टांत हे ज्ञानेश्वरीतील बाराव्या अध्यायातील अगदी जशास तसे आहेत. खालील ओंव्याचे अवलोकन केले तर आपणांस कळेल

''का घरींचिया उजियेडु करावा। पारकिंया आंधारु पाडावा।
हें नेणचि गा पांडवा। दीपु जैसा ॥ १९८॥
जो खांडावया घावो घाली। कां लावणी जयानें केली ।
दोघां एकचि साऊली । वृक्ष दे जैसा ॥ १९९॥
गाईची तृषा हरुं। कां व्याघ्रा विष होऊनि मारुं।
ऐसे नेणेचि कां करु। तोय जैसे ॥ १४७ ॥''[५]

Govt. College of Arts & Science ★ Aurangabad ★

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675, Issue NO, 318 (CCCXVIII) A
ISSN : 2278-9308
September, 2021

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वाङ्मय संस्कृती संबधी आपली भूमिका २ मे १९५४ रोजीच्या विदर्भ साहित्य संघातील भाषणमधून स्पष्ट केलेली आहे. जीवनाचे आणि साहित्याचे अतूट 'नाते' त्यामधून व्यक्त झाले आहे. ते म्हणतात ''आपण आपल्या जीवनाकडे, कर्तव्य धर्माकडे आणि संस्कृतीकडे दुर्लक्ष करीत आहोत. थोडे अंतर्मुख होवून विचार केला तर आपली जीवनमूल्ये आणि सांस्कृतिक मूल्ये कशी करपून जात आहेत याचं भेसूर चित्र उभं राहील. कारणं काहीही असोत पण आपण अध:पतनाच्या, अवनतीच्या मार्गावरुन जात आहोत असे आढळून येईल''[६] डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे प्रस्तुत विचार पाहिले तर कोणताही सूज्ञ वाचक अभ्यासक अंतर्मुख होईल. आपल्या जीवनाचे कर्तव्य काय आहे? आपली जीवनमूल्ये कोणती? तीचे संवर्धन, जोपासना करण्यांसाठी प्रेरित झाले पाहिजे हा संदेश डॉ. आंबेडकर देतात. सांस्कृतिक मूल्यांच्या बाबतीत ते सजग राहण्यास सुचवितात. आपल्या आदर्श परंपरा, मूल्ये, नैतिकता यांचा –हास होता कामा नये. आपण संक्रमणात आहोत असा इशारा ते देतात. आपली जीवनमूल्ये आणि सांस्कृतिक मूल्ये यांचे संवर्धन करण्यासाठी ते साहित्यिकांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव करुन देतात. ''तेव्हा तत्परतेने सावध होऊन जीवन व संस्कृतीविषयक मूल्ये साहित्यकारांनी जोपासली पाहिजेत, ती सतेज बनवली पाहिजेत, वृध्दिगत केली पाहिजेत, तुमच्या कथा कादंबरीतील सीता आता लक्ष्मण रेषा ओलांडून जात आहे। दुर्योधनाच्या राजदरबारात द्रोपदी वस्त्रहरण होत आहे आणि दुष्यंत शकुंतलेला ओळख देत नाही तो वनवासी होत आहे''[७] स्वातंत्र्यानंतर सामाजिक परिवर्तनाचा वेग वाढू लागला. बदलत्या सामाजिक, राजकीय, आर्थिक वातावरणाचा परिणाम साहित्यिकांनी स्वीकारला पाहिजे. हे विचार स्पष्ट करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर रामायण – महाभारतातील प्रतीकात्मक भाषेत उदाहरणे देतात.

साहित्यिकांकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर काही अपेक्षा व्यक्त करतात. नव्हे साहित्यिकांचे ते प्रेरणास्थान किंबहुना उर्जास्त्रोत बनतात; ''मला साहित्यकारांना आवर्जून सांगायच आहे की, उदात्त जीवनमूल्ये आपल्या साहित्यप्रकारातून आविष्कृत करा; आपल लक्ष आंकुचित मर्यादित ठेवू नका तर ते विशाल करा; आपली वाणी चार भिंतीपुरती राखू नका तर तिचा विस्तार होऊ द्या; तिचं तेज खेडयापाडयातील गडद अंधार दूर होईल अस प्रवर्तित करा; आपल्या देशात उपेक्षितांचं– दलितांचं फार मोठ जग आहे हे विसरु नका; त्यांचचं दु:ख, त्यांची व्यथा समजून घ्या आणि आपल्या साहित्याद्वारे त्यांचचं जीवन उन्नत करण्यास झटा. त्यातच खरी मानवता आहे.''[८] तत्कालीन साहित्यिकांनी वैश्विकतेची कास धरुन साहित्य निर्मिती केली पाहिजे. साहित्याने आपली यथार्थता, अन्वयार्थकता गमावून बसता कामा नये, उपेक्षित जगाकडे लक्ष घाला, त्यांच ही एक विशिष्ट जग आहे; त्यांच्यासाठी लिहिते व्हा! तुमची प्रतिभा संकुचित न ठेवता व्यापक करा. तिला पुष्कळ धुमारे फुटू दया असे आव्हान डॉ. बाबासाहेब आंबेडकर करतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मानव मुक्तीचा ध्यास घेतलेला होता. जात, पंथ, धर्म, वंश याहीपेक्षा मानवता श्रेष्ठ आहे हे महात्मा फुले यांचे विचार त्यांच्या अंगी बाणले होते. गौतम बुध्द, संत कबीर व महात्मा फुले यांना त्यांनी गुरु मानले. गौतम बुध्दांच्या विचारांचा,तत्वज्ञानांचा त्यांच्यावर गाढ प्रभाव होता त्यातूनच त्यांनी 'बुध्द अ‍ॅण्ड हिज धम्म' हा ग्रंथ लिहिला. तर संत कबीर, संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर आदिंची भजने त्यांनी लहान वयापासूनच गायिली होती. संत कबीरांच्या महान वचनांचा ते आपल्या भाषणातून सर्रासपणे वापर करीत असत. 'मानूस बनना कठीन है तो साधू क्या बने' असे ते म्हणत. महात्मा फुले यांच्या मार्गाने आपणांस जाणे गरजेचे आहे. त्यांची अपरिहार्यता ते निक्षून सांगत असत.

संत साहित्याची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना विशेष रुची होती. वारकरी संप्रदयाचा त्यांच्या साहित्याचा त्यांनी अगदी बारकाईने अभ्यास केला होता. वारकरी संप्रदयावर गौतम बुध्दांच्या विचारांचा प्रभाव आहे; 'मूकनायकचे', ब्रीदवाक्य खालीलप्रमाणे होते.

काय करु आता धरुनिया भीड।
नि:शंक हे तोंड वाजविले।
नव्हे जगी कोणी मुकियाचा जाण।
सार्थक लाजोनी नव्हे हित।। – संत तुकाराम

Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675, Issue NO, 318 (CCCXVIII ) A
ISSN : 2278-9308
September, 2021

ज्याला समाज जागा करावयाचा आहे त्याला भिडभाड न धरता सातत्याने तोंड वाजवावेच लागते. मुके लोक बोलू शकत नाहीत. मात्र त्यांचे नायकत्व स्वीकारलेल्या मनुष्याला आयुष्यभर बोलणे भाग पडते. ते ऐकूनच ख–या अर्थाने मुक्यांना वाचा फुटत असते 'बहिष्कृत भारत', 'मूकनायक' यांच्या शिरोभागी अग्रलेखांची शीर्षके पाहू शकतो.

महापुरे झाडे जाती। तेथे लव्हाळे वाचती।

वैष्णूमय जग। वैष्णवांचा धर्म। भेदाभेद भ्रम। अमंगळ।। -- संत तुकाराम

अशी संताचे वचने दिल्यामुळे लोकभाषेचा वापर होऊ लागला व आपला विचार प्रभावीपणे लोकांपर्यंत जाऊ लागला. म्हणजेच उपरोक्त दोन्ही प्रकारचा हेतू डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा होता. मराठी साहित्यात ज्ञानेश्वरी आणि 'तुकारामगाथा' या ग्रंथाना अनन्यसाधारण असे महत्व आहे असे ते मानत. म्हणूनच त्यांच्या लेखनात महाभारत, रामायणाबरोबरच संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत चोखामेळा, संत एकनाथ, संत नामदेव, संत रोहिदास आदिसंताचे संदर्भ येतात.

संत साहित्याबरोबरच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आधुनिक वाड्.मयाचा ही अभ्यास केला होता. महात्मा फुले, हरिभाऊ आपटे, गोपाळ गणेश आगरकर, लोकमान्य टिळक, राम गणेश गडकरी, गो.ब. देवल, लोकहितवादी, आदींचे साहित्य त्यांनी अभ्यासले. 'खरा ब्राम्हण'. या नाटकाची त्यांनी समीक्षा केली होती. महाविद्यालयीन जीवनात 'किंगलियर' या नाटकांवरुन त्यांनी 'शहाणी मुलगी' हे नाटक लिहिले. व त्याचा प्रयोगही केला. म्हणजे मराठी साहित्याबरोबरच त्यांनी इंग्रजी साहित्य अभ्यासले होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आणखीन एक पैलू म्हणजे त्यांचा संस्कृत साहित्याचा अभ्यास दांडगा होता. १९४६ मध्ये 'हु वेअर दी शुद्राज' हा ग्रंथ प्रकाशित झाला. या ग्रंथांचा उत्तरार्ध म्हणजे 'दि अनटचेबल्स' हा ग्रंथ १९४८ मध्ये प्रकाशित झाला. प्रस्तुत दोन्ही ग्रंथ हे संशोधनपर शोधप्रबंध आहेत. त्यासाठी त्यांनी संस्कृत साहित्यांचे काही संदर्भ दिले. 'मृच्छकटिकम्' हे नाटक शुद्रक नावाच्या राजाने लिहिले असे मानले जाते. शुद्रकाविषयी इतिहासात इत्यंमभूत माहिती नाही. म्हणून तो पौराणिक राजा आसावा. असे काही अभ्यासकांचे मत आहे. या मध्ये काही घटना मागाहून लिहिल्या असण्याची शक्यता नाकारता येत नाही. या संदर्भात डॉ. रुस्तुम अचलख म्हणतात'' 'शुद्रक' या नावाचा उल्लेख स्कंधपुराण, कथा सरित्सागर व बाणाने लिहिलेल्या. हर्षचरित्रात आणि कादंबरीत आढळतो. प्राचीन काळी शुद्रक राजे होऊन गेले म्हणून शुद्रकाचा काळ ठरविणे मोठे कठीण काम आहे.''[९]

तात्पर्य 'दि अनटचेबल्स' या ग्रंथात बाबासाहेब आंबेडकरांनी 'मृच्छकटिकम्' नाटकाचा संदर्भ म्हणून उद्‌धृत केला आहे. त्यावरुन संस्कृत नाटकाचा तसेच तत्कालिन संस्कृत ग्रंथाचा आंबेडकराचा अभ्यास दांडगा होता हे सिध्द होते. ते सातत्याने आपल्या भाषणांमधून लोकांना जागृत करीत अगदी १५.१२.१९५२ रोजी मुंबई विद्यापीठात जे भाषण केले, त्यामध्ये ते म्हणतात ''प्राध्यापक हे स्वयंप्रेरणेने विद्यादान करीत नाहीत यांकडे त्यांनी लक्ष वेधले होते ते म्हणाले'' त्यांना (प्राध्यापकांना) प्लेटो, बेकन, नित्से , स्पिनोझा यांसारख्या तत्वज्ञान्यांच्या तत्वज्ञानासंबधी अवाक्षरही माहित नसते''[१०] हे इंग्रजी साहित्य व तत्वज्ञानाच्या संदर्भात झाले. प्राचार्य म.भि. चिटणीसांनी लिहिलेले 'युगयात्रा' हे नाटक बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने येथील पिचलेला, पिळलेला 'माणूस' आत्मशोधाची जाणीव ठेवून, स्वत:भोवतीच्या वास्तवाशी–संस्कृतीशी असलेले नातेसंबध आणि इतिहासातले स्थान शोधू लागला. स्वातंत्र्य, समता, बंधुता हया मूल्यांची कास धरणारे साहित्य लिहू लागला. डॉ. नागनाथ कोत्तापले म्हणतात, ''आजच्या दलित साहित्यापुरते बोलायचे झाले तर डॉ. आंबेडकर हे प्रमुख उर्जाकेंद्र आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रकाशतही नवी चळवळ जीवनाचा एक नवा अन्वयार्थ लावू पाहते. धर्मव्यवस्थेने येथील माणसाला बंदिस्त केले आहे. म्हणून त्यांच्या लौकिक जीवनाची ससेहोलपट तर होतेच; पण त्याची आत्मिक उन्नतीही होत नाही. म्हणून वर्णव्यवस्थेची अनेक मजली इमारत उध्द्वस्त केली पाहिजे. हे विचारांचे खरे सूत्र आहे. या विचारांच्या प्रकाशातच जीवनाचा नवा अर्थ लावण्याचा प्रयत्न दलित साहित्यिक करु लागले आहेत. म्हणूनच त्यांना पुनर्जन्म आणि कर्मवादाचे थोतांड कळू लागले आहे. त्यातूनच जीवनाची एक वेगळी मांडणी करणारे साहित्य निर्माण होऊ लागले''[११]

Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675, Issue NO, 318 (CCCXVIII ) A
ISSN : 2278-9308
September, 2021

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संपूर्ण आयुष्यच एक झंझावात होता. त्यांचे विचार क्रांतिकारक, स्पष्ट, निसंदिग्ध, आणि निर्भेळ होते. मग ते कोणत्याही बाबतीतील असोत." देशातील कोटयावधी जनतेला हेलावून सोडण्याचे सामर्थ्य आंबेडकरांच्या वाणीला व लेखनीला प्राप्त झाले. ते त्यामागे असलेल्या मानवता वादाच्या दिव्य वलयामूळे! या समाजावर दूरगामी परिणाम साधणारे अनेक प्रभावी शक्तीप्रवाह आंबेडकरांच्या राजकीय विचारांनी निर्माण केले." हे डॉ. भा.ल.भोळे यांचे संदर्भात असलेले मत महत्वपूर्ण किंबहुना सार्थ वाटते.

बाबासाहेब आंबेडकरांनी विपुल साहित्य वाचलं होतं. विविध कलांविषयी त्यांना उपजतच आवड होती. साहित्य संगीत, चित्र, शिल्प, नाटय या कलांचा त्यांनी रियाझ केला होता. म्हणून त्यांच्या वैचारिक साहित्यातही लालित्य दिसून येतं. त्यांच्या वैचारिक साहित्यातही नवनिर्मितीचा ध्यास होता. समाजाचा समतोल साधण्यांसाठी त्यांनी आपल उभं आयुष्य खर्ची घातलं. 'विचारसौंदर्य' हाच त्यांच्या लेखनांचा मुख्य विशेष म्हणता येईल. सत्याची कास, मानवी प्रतिष्ठा, आशयगर्भता हया गुणांनी त्यांचे लेखन समृध्द आहे. या अनुषंगाने डॉ. यशवंत मनोहर म्हणतात. " त्याचे साहित्य म्हणजे प्रतिसृष्टीचं सौंदर्यशास्त्र ठरलं आणि ही प्रतिसृष्टी निर्माण करणा—या सौंदर्यशास्त्राचाही भक्कम प्रस्ताव त्यांनी मांडला"[१२] डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या साहित्याचा विशेष म्हणजे ते समाजाची एकसंध आहे. सामाजिक जीवनात नवनवे प्रश्न निर्माण होतात; त्या प्रश्नांना सामोरे जाण्याचं सामर्थ्य साहित्यात असले पाहिजे. सुखामध्ये फार हुरवळुन न जाणे, आणि दुःखामध्ये न कोलमडणे असे दुहेरी सामर्थ्य माणसांत साहित्यांने निर्माण केले पाहिजे. संकटात निराश, उदास न होता लढण्याची उर्मी ललित साहित्याने निर्माण करावी; आणि हाच खरा विधायक परिणाम ललित साहित्यातून झाला पाहिजे; ही भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची होती. साहित्य हे सर्वांचे असले पाहिजे. ते कोण्या एका विशिष्ट वर्ग. समूहाचे, पंथाचे, धर्माचे जातीचे आसता कामा नये.

डॉ. आंबेडकरांच्या व्यक्ति मनाला कारुण्याची किनार होती. प्रज्ञा, करुणा, शील या तत्व त्रयींना त्यांच्या जीवनात अनन्यसाधारण महत्व होते. त्यांनी ललित साहित्यापेक्षा वैचारिक साहित्य बहुतांश लिहिलेले असले तरी त्यांची भाषा लालित्यपूर्ण आहे. साहित्यिकांनी बागेतली सुंदर फुलं तोडण्यापेक्षा कष्ट करुन सुंदर बाग निर्माण करावी आणि स्वतःच माळी बनावं. हया त्यांच्या विधानातच खरा नवनिर्मितीचा ध्यास आहे. त्यांनी ग्रंथाना लिहिलेल्या अर्पणपत्रिका अत्यंत नाजूक, उत्कट आणि तस भावुकतेंने ओंथबलेल्या आहेत. लालित्य किंबहुना काव्यमयता त्यांच्या वैचारिक लेखनाबरोबरच प्रवासवर्णन आणि जीवनचरित्र लेखना आणि पत्रलेखनांतही जाणवते. उदा 'जिथं बंधारा फुटला तिथं पाण्याचा लोंढा अडवून धरीन असं म्हणण्यात काय अर्थ? हे शारदा कबीर यांना लिहिलेल्या पत्रातील उदाहरण अत्यंत बोलके आहे.

पत्रलेखनातील बाबासाहेब आंबेडकरांच्या भाषेतून लालित्य, चिंतनशीलता व सूचकता आणि काळजाचा ठाव घेणारी उत्कटता पावलोपावली दिसून येते. त्यांच्या पत्रलेखनाची भाषा सर्जनशील तर आहेच, त्याचबरोबर रुपक, प्रतीक, प्रतिमांचा सुंदर वापर तिच्यात केला आहे. डॉ. यशवंत मनोहर"[१३] यांनी काही उदाहरणे परिवर्तनाचे 'पडघम' या पुस्कात 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लेखनातील 'लालित्य' या लेखात दिली आहेत. त्यातील काही अशी.......

- मी एकटाच प्राणी काय तो मुंबईत कुजत पडलो आहे.
- ज्या धर्मात माणसाला माणुसकीनं वागण्याची मनाई आहे तो धर्म नसून शिरजोराची सजावट आहे.
- माझ्याबरोबर निष्ठेनं कार्य केलेल्या माझ्या जुन्या कार्यकर्त्यांनाही मी वनवासात सोडणार नाही.
- हे खातं म्हणजे अवघ्या बुद्‌या वकिलांना करमणुकीसाठी दिलेलं पोकळ खेळणं आहे.
- या विलाची अक्षरशः हत्या करण्यात आली.

वरील वाक्यातील कुजत पडणं (प्रतिमा), शिरजोरांची सजावट (भाषिक चमत्कृती), वनवासात सोडणार नाही (रुपकरचना), करमणुकीतील पोकळं खेळणं (प्रतिमा), थोडक्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर फक्त अभिधेने आशय मांडत नाहीत तर भाषेची प्रभावक्षमता वाढवण्यासाठी ते वेळोवेळी लक्षणेची चपखलपणे योजना करतात. बाबासाहेब आंबेडकरांमध्ये एक मोठा ललित लेखक दडलेला होता. तो त्यांच्या भाषेतून मुक्तपणे संचारत असे. डॉ. यशवंत मनोहर म्हणतात

Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

त्याप्रमाणे " त्यांच्या कल्पनेला इशे पंख फुटलेले आहेत आणि आपल्याच नादात ही कल्पनाशक्ती लालित्याच्या सुंदर नभात भरा—या घेत आहे"[१४] आणखीन काही उदाहरणे आपण प्रतिनिधीक स्वरुपात पाहू शकतो.

• या कालव्याच्या जलमार्ग रुपी माळेत हे तलाव म्हणजे गुलाबाच्या फुलांप्रमाणे अधूनमधून गोवण्यात आलेल जणू काय गुच्छच आहेत.

• ही प्रचंड थडगी त्यांच्या वैभवाचीच स्मारकं नसून त्या काळच्या गुलाम मजुरांच्या श्रमाची व गुलामगिरीची ही स्मारकं आहेत.

• आगीतून निसटून फुफाटयात सापडावं अशी माझी स्थिती झाली.

• बोटीवर चढतांना परस्परविषयक परकेपणाची व बर्फवत थंडगार तटस्थ वृत्तीने जे तट आमच्यात उभे होते.

• इतरांशी बोलण्याची इच्छा समुद्राच्या घनगंभीर गर्जनेपुढे मनातल्या मनात विरुन जाते. अशा वेळेस अगदी स्वाभाविकपणे विचार अंतर्मुख बनतात. मन भूतकाळात धावं घेत. विस्मृतीच्या तळाशी दडून बसलेल्या आठवणी पुन्हा नजरेसमोर बागडू लागतात. प्रस्तुत काही वाक्यांशाचे अवलोकन केल्यास त्यामध्ये शब्दाची लय अर्थाची लय, शब्दसौंदर्य, रुपक, प्रतीक, प्रतिमांचा डॉ. आंबेडकरांनी केलेली योजना ही समर्पक आहे याचा प्रत्यय येतो.

उपरोक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे साहित्यविषयक विचार, संशोधन, त्यांची भूमिका, त्यांच्या साहित्याची भाषा या संदर्भात काही निरीक्षणे नोंदवता येतील.

• डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वैचारिक ग्रंथ लिहिले असे तरी त्यांची पत्रे, प्रवासवर्णन आणि चरित्रविषयक लेखनात ललित साहित्य आणि त्याचे सौंदर्य अभिव्यक्त होते.

• त्यांचा मराठी, इंग्रजी, संस्कृत, हिंदी, पाली आदि साहित्यविषयक ग्रंथाचा त्यांचा अभ्यास दांडगा होता. हे त्यांच्या वेळोवेळी प्रसंगानुरुप केलेल्या भाषण आणि लेखनातून आपणांस गोचर होते.

• बाबासाहेब आंबेडकरांच्या लेखनातून प्रगल्भ बुध्दिमता, कल्पकता, दुरदृष्टी, वैचारिकता आणि त्या जोडीला भावनांच लालित्य यांचा सुरेख संगम झालेला दिसतो.

• डॉ. जनार्दन वाघमारे'[१५] म्हणतात त्याप्रमाणे " बाबासाहेबांचे लेखन म्हणजे सौरउर्जेचा अक्षय स्त्रोत! बाबासाहेबांच्या क्रांतिकारी विचारांनी दलित पददलितांच्या चळवळींना हात्तीचे बळ दिले. त्याची आज फलनिष्पती दलितच नव्हे तर दलितेत्तर साहित्यिकांना बाबासाहेबाचे साहित्यिक विचार प्रेरणादायी ठरले.

• डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या साहित्यिक विचारांला, किंबहुना लेखणाला गौतम बुध्दाचे तत्वज्ञान, वैज्ञानिक दृष्टीकोन, कबीरांच्या दोहयाचे समतेचे सुक्त, आणि महात्मा फुले यांचा समतेसाठी व मानवतेसाठीचा सत्यशोधक लढा या सर्वांचे आधिष्ठान होते.

• डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर संत साहित्याचा प्रभाव आहे, किंबहुना विशेष करुन संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम यांचे साहित्यातील योगदान त्यांनी वेळोवेळी अधोरेखित केलेले आहे.

• डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपली भाषा लोकांपर्यंत संदेशवहनाचे प्रभावी माध्यम होण्यासाठी, प्रसंगी लोकसंस्कृतीतील म्हणी, वाक्यप्रचार, सुभाषिते, रामायण महाभारतातील व संतांची वचनांची उदाहरणे दिली आहेत.

• भाषिक अनुषंगाने एक निरीक्षण नोंदवले तर त्यांच्याच भाषेत बोलायचे म्हटले तर ते ग्रंथाची भाषा जीवंत आणि नारळातील पाण्यासारखी मधुर असावी. ग्रंथ वाचनाने माणसाची झोप उडावी. त्यांची विचारशक्ती जागृत व्हावी. लेखनशैली प्रासादिक, सुगम, उत्तेजक आणि वाचकांची तंद्री लागेल अशी असावी.

संदर्भ

१. सुरवाडे विजय (संपा); डॉ. बाबासहेब आंबेडकरांची निवडक भाषणे भाग पहिला (१९२०—३६) लोकवाड्मय गृह, मुंबई, पाचवी आवृत्ती मे २०१६,पृष्ठ — ३८
२. तत्रैव पृष्ठ — ३८
३. तत्रैव पृष्ठ — १२४

Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675, Issue NO, 318 (CCCXVIII ) A
ISSN : 2278-9308
September, 2021

४. तत्रैव पृष्ठ — १६
५. श्री ज्ञानेश्वरी , गुढार्थदीपिका, गीताप्रेस, गोरखपूर, पाचवा संस्करण पृष्ठ — ५१६,५२७.
६. लुलेकर प्रल्हाद, दलितेतरांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर : अनंत पैलूचा सामाजिक योध्दा, सायन पब्लिकेशन, पुणे, द्वितीयावृत्ती २०१२,पृष्ठ — १९५
७. तत्रैव पृष्ठ — १९५.
८. कुंभार प्रकाश, दलित साहित्य काही विचार काही दिशा, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती २००२, पृष्ठ — २०
९. अचलखांब रुस्तुम, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ग्रंथलेखन, एक आकलन स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती २०११, पृष्ठ — २६.
१०. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लेखन आणि भाषणे, खंड १८, भाग ३, (महाराष्ट्र शासन),पृ. ३२२
११. कोत्तापले नागनाथ, साहित्याचा अन्वयार्थ. स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, दुसरी आवृत्ती ऑगस्ट २००८, पृष्ठ — ४६.
१२. मनोहर यशवंत, परिवर्तनाचे पडघम, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, पहिली आवृत्ती १ जाने. २०१६, पृष्ठ — ८३.
१३. तत्रैव पृष्ठ — ८५.
१४. तत्रैव पृष्ठ — ८६.

---

[i] योगेंद्र मेश्राम -दलित साहित्य उदगम आणि विकास- श्री मंगेश प्रकाशन नागपूर- पृष्ठ क्रमांक -०७

[ii] उक्त पृष्ठ क्रमांक - ११

[iii] उक्त पृष्ठ क्रमांक - ०७

[iv] प्रकाश खरात- साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह - दिलीपराज प्रकाशन पुणे -पृष्ठ क्रमांक -११७

[v] डॉ.वासुदेव मुलाटे- दलितांची आत्मकथने संकल्पना व स्वरूप - स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद-पृष्ठ क्रमांक - ३७

[vi] योगेंद्र मेश्राम -दलित साहित्य उदगम आणि विकास- श्री मंगेश प्रकाशन नागपूर- पृष्ठ क्रमांक – १४-१५

Govt. College of Arts & Science Aurangabad.

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad